**<u>आदेश निशाणी क्रमांक ४४ वर पारित</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दावा दुरूस्ती करीता दाखल केलेला आहे. सदर अर्जात व युक्तीवादात वादी यांचे थोडक्यात कथन असे आहे की, प्रस्तुत दावा त्यांनी वाटपासाठी दाखल केलेला आहे. तसेच सदर वादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रस्तुत दावा दाखल करण्याच्या अगोदर दिनांक २२/११/२०२० रोजी त्यांनी सदर दाव्याबाबत प्रतिवादी क्र.१ यांना नोटीस पाठविली होती. तसेच सदर नोटीसला सदर प्रतिवादी क्र. १ यांनी दिनांक ३०/११/२०२० रोजी उत्तर देखील दिलेले आहे. तसेच त्यानंतर वादी यांनी दिनांक २४/१२/२०२० रोजी सदरचा दावा दाखल केलेला आहे.

२) सदर वादीच्या म्हणण्याप्रमाणे सदर दाव्याबाबत सदर प्रतिवादी क्र.१ यांना नोटीसद्वारे माहिती मिळाली होती. तरी देखील सदर प्रतिवादी क्र. १ यांनी दावा परिच्छेद क्रमांक–अ मध्ये दर्शविलेली दावा मिळकत सदर प्रस्तावित प्रतिवादींना दिनांक ०८/१२/२०२० रोजी नोंदणीकृत खरेदी खत क्र. १९५८/२०२० नुसार विक्री केलेली आहे. त्यामुळे दावा मिळकतीचे वादातील

खरेदी खत त्यांना रद्द करून मागणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर वादी यांनी प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणे दावा दुरूस्ती करण्यास परवानगी मिळण्याची मागणी केलेली आहे.

३) प्रस्तुत अर्जास प्रस्तावित प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी त्यांचा खुलासा दाखल केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत दावा दाखल करण्यापूर्वी दावा मिळकत विक्री झालेली आहे. त्यामुळे सदर अर्ज नामंजूर करण्याची विनंती सदर प्रस्तावित प्रतिवादी यांनी केलेली आहे.

४) तसेच प्रस्तावित प्रतिवादी क्र. ७ यांना अनेक प्रयत्न करून देखील सदर अर्जाची नोटीस प्राप्त झालेली नाही. तसेच सदर अर्ज हा दिनांक ०२/०२/२०२२ पासुन प्रलंबित आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्याचे पुढील कामकाज प्रलंबित आहे. म्हणून सदर अर्जाचे स्वरूप विचारात घेता, सदर अर्ज प्रस्तावित प्रतिवादी क्र. ७ विरूध्द व इतर प्रतिवादी विरूध्द विना खुलासा चालविण्यात येतो.

५) प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील लेखी खुलासा तसेच अभिलेखावर

असलेल्या सर्व दस्त ऐवजांचे अवलोकन केले. तसेच दोन्ही पक्षकारांच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

६) प्रस्तुत दावा वादी यांनी दावा मिळकतीमध्ये वाटप मिळण्याकरीता व कायम मनाई हुकुमाकरीता दाखल केलेला आहे. तसेच सदर दावा आज रोजी वाद मुद्दे निश्चित करण्याकरीता प्रलंबित आहे. तसेच सदर अर्जातील मागणीचा विचार केला असता, सदर अर्जात नमूद वादातील व्यवहार हा प्रस्तावित प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी नाकारलेला नाही. तसेच सदर वादातील खरेदी खताची छायांकित प्रत देखील वादी यांनी अभिलेखावर दाखल केलेली आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्यात परिशिष्ट क्रमांक–अ मध्ये नमूद केलेली दावा मिळकत प्रतिवादी क्र.१ यांनी सदर प्रस्तावित प्रतिवादी यांनी विक्री केलेली असल्याचे स्पष्ट होते.

७) तसेच प्रस्तुत दाव्यातील मागणीचा विचार केला असता, प्रस्तुत दावा वादी यांनी दावा मिळकतीमध्ये वाटप मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. तसेच सदर प्रस्तावित प्रतिवादी यांनी नोंदणीकृत खरेदी खत क्र. १९५८/२०२० नुसार विकत घेतलेली शेत जमिन प्रस्तुत दाव्यात दावा मिळकत म्हणून समाविष्ट आहे.

त्यामुळे सदर दाव्यातील वाटपाच्या मागणीचा विचार केला असता, प्रस्तुत दाव्यातील सर्व वाद प्रश्न निकाली काढण्याकरीता करीता सदर अर्जातील मजकूर मुळ दाव्यात समाविष्ट करण्याची परवानगी वादी यांना देणे आवश्यक आहे. त्यामुळे खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## // आ दे श //

१) प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ६ नियम १७ अन्वये मंजूर करण्यात येतो.

२) प्रस्तुत अर्जातील प्रस्तावित दुरूस्ती मजकुर मुळ दाव्यात दुरूस्तीनुसार समाविष्ट करण्याची वादींना परवानगी देण्यात येते.

३) वादी यांनी आदेशात नमूद केल्या प्रमाणे आज पासुन १४ दिवसांच्या आत दावा दुरुस्ती करुन त्याबाबत दुरुस्ती प्रत अभिलेखावर दाखल करावी.

४) वादी यांनी सदर दावा दुरूस्तीच्या अनुषंगाने आवश्यक ती कोर्ट फीस न्यायालयात जमा करावी.

BHARAT SANTARAM JAGDALE
Digitally signed by BHARAT SANTARAM JAGDALE
Date: 2024.07.18 14:54:46 +0530

ठिकाण :– दिग्रस
दिनांक :– १५/०७/२०२४

(भरत सं. जगदाळे)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
दिग्रस.